RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ९, अंक ६] गुरुवार ते बुधवार, जून ८-१४, २०२३/ज्येष्ठ १८-२४, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक सीआरसी २०१८/प्र.क्र.१८०(३)/का.बारा.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, (१८६९ चा १४) याचे कलम १४ आणि १९ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, बीड जिल्ह्यातील केज व धारुर महसुली तहसिलाशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढीलप्रमाणे असे निदेश देत आहे की, दिनांक ११ जून, २०२३ पासून,—

(क) बीड महसुली जिल्ह्यामध्ये केज येथे एक न्यायालय असेल आणि, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश हे उक्त न्यायालयाच्या अध्यक्षस्थानी असतील; आणि,

(ख) उक्त न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमा, बीड जिल्ह्यातील केज व धारुर महसुली तालुक्यामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांशी समव्यापी व समाविष्ट असतील; आणि,

(ग) केज व धारुर महसुली तालुक्याच्या संबंधात प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड यांचे सर्व अधिकार, उक्त अधिनियमाच्या कलम ९ अन्वये प्रमुख जिल्हा न्यायाधीशांकडे निहित असलेल्या अधिकारांव्यतिरिक्त आणि त्यांस योग्य वाटतील अशी प्रकरणे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश केज यांच्याकडे सोपविण्याच्या किंवा स्वतःहून निकाली काढण्याच्या किंवा सक्षम अधिकारीतेच्या इतर न्यायालयाकडे सोपविण्याच्या त्यांच्या अधिकारांखेरीज, केज येथील उक्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश यांचेकडे निहीत असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने ,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, Dated the 31st May, 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Civil Courts Act.

No. CRC 2018/CR 180(I)/Desk XII.— In exercise of the powers conferred by sections 14 and 19 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and in partial modification of all other earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the revenue tahsils of Kaij and Dharur in Beed District, the Government of Maharashtra directs that, with effect from the 11th June, 2023, —

(*a*) there shall be a Court at Kaij in the revenue district of Beed and the said Court shall be presided over by the Additional District Judge ;

(*b*) the local limits of the ordinary jurisdiction of the said Court shall be co-extensive with and cover the areas comprising the revenue tahsils of Kaij and Dharur in Beed District ; and

(*c*) all the powers of Principal District Judge, Beed in respect of the revenue tahsils of Kaij and Dharur shall vest in the said Additional District Judge at Kaij except those vested in the Principal District Judge under section 9 of the said Act and except his power to assign to the Additional District Judge, Kaij or withdraw unto himself or to assign to another Court of competent jurisdiction, such matters as he thinks fit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

## विधि व न्याय विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे, २०२३.

### अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी २०१८/प्र.क्र.१८०(४)/का. १२.— फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यात अंमलात असताना, त्याच्या कलम ७ तसेच कलम ९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा, बीड जिल्ह्यातील केज व धारुर महसुली तालुक्याशी त्यांचा जेथवर संबंध असेल तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, उच्च न्यायालय मुंबई यांच्याशी विचार विनिमय करून, याद्वारे दिनांक ११ जून, २०२३ पासून, बीड जिल्ह्यातील केज व धारुर महसुली तालुक्याकरिता सत्र उपविभागाची निर्मिती करीत आहे आणि उक्त सत्र उपविभागाच्या हद्दीमध्ये उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश ज्यांचे अध्यक्ष असतील, असे सत्र न्यायालय केज येथे स्थापन करीत आहे. प्रमुख सत्र न्यायाधीश, बीड हे केज सत्र उपविभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील आणि त्यांना, उक्त सत्र उपविभागामध्ये प्रकरणांतील अधिकार स्वतःहून काढून घेण्याचे किंवा सलग अधिकारीतेच्या इतर कोणत्याही न्यायालयास नेमून देण्याचे किंवा त्यांस योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, केज येथील सहायक किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचेकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने ,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 31st May, 2023.

*NOTIFICATION*

Code of Criminal Procedure, 1973.

No. CRC 2018/CR 180(II)/Desk XII.— In exercise of the powers conferred by section 7 read with section 9 of the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf ; and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the revenue tahsils of Kaij and Dharur in the Beed District, the Government of Maharashtra, after consultation with the High Court of Judicature at Bombay, hereby creates, with effect from the 11th June, 2023, the sessions sub-division for the revenue tahsils of Kaij and Dharur in Beed District and establishes a Court of Sessions at Kaij, to be presided over by the Additional Sessions Judge for trial of cases arising within the limits of the said sessions sub-division. The Principal Sessions Judge, Beed shall also be the sessions judge for Kaij session sub-division and shall have the powers to withdraw unto himself or to assign to any other Court of competent jurisdiction, cases from the said sessions sub-division, or to assign unto the Assistant or Additional Sessions Judge at Kaij, any such cases as he thinks fit.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.